**अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
मुंबई यांना विभाग प्रमुख घोषित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. मजनिप्रा- २०१७/६३०/(प्र.क्र.१४६/१७)जसं (आस्था)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०२ एप्रिल, २०१८.

वाचा :-१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि. १७/४/२०१५.
२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई यांचे पत्र क्र.मजनिप्रा/आस्था/६४९, दि.२१/११/२०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल, समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन,वाटप व वापर सुकर करण्यासाठी आणि त्याची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ४ मे,२००५ रोजी प्रसिध्द झाला आहे. सदरहू अधिनियमाद्वारे दिनांक १२ ऑगस्ट, २००५ पासून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि. २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना विभाग प्रमुख घोषित करण्याचा प्रस्ताव एकमताने समंत करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना विभाग प्रमुख घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. १७ एप्रिल, २०१५, मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक मधील अनुक्रमांक-१, नियम क्रमांक २, स्तंभ ६ मधील अटींच्या अधिन राहून अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना विभाग प्रमुख घोषित करण्यात येत आहे. हे अधिकार विभाग प्रमुखांना वित्तीय बाबी पुरतेच मर्यादित राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४०४११५५४२४८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajnish
Ramkishor
Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, serialNumber=293016b5f13cd03f75c9f34c66d956309c8b3cd5faf07931d817577e6116e436, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2018.04.04 11:58:33 +05'30'

(र. रा. शुक्ला)
अधिक्षक अभियंता व उप सचिव (जसं)
महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
५) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सहसचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) उपसचिव, वित्त विभाग/विनियम,मंत्रालय, मुंबई.
९) उपसचिव, वित्त विभाग/सेवा-६,मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) जसं (आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.